MHSO200010122025

दाखल तारीख १५/०५/२०२५
नोंदणी तारीख १५/०५/२०२५
निकाल तारीख १७/०३/२०२६
कालावधी व. म. दि.
००  १०  ०२

**पार्ट 'अ'**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला, जि. सोलापूर यांचे न्यायालयात**

**( पीठासीन अधिकारीः– श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**

**दि. १७ मार्च २०२६**
**नियमीत फौजदारी खटला क्र.१४२/२०२५** **निशाणी क्र.___**
**सांगोला पोलीस ठाणे गु. र. क्र.१८१/२०२५**

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र सरकार तर्फे
सांगोला पोलीस ठाणे,
ता. सांगोला, जि. सोलापूर.

**अभियोग पक्षातर्फे** : सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुजावर

**विरुध्द**

**आरोपी** : १. नौशाद उर्फ नौशादमियॉ बापुसाहेब मुलाणी,
वयः ४७ वर्षे, धंदाः नोकरी,
२. उल्फत नौशाद उर्फ नौशादमियॉ मुलाणी,
वयः ४२ वर्षे, धंदाः घरकाम,
रा.– कडलास, ता. सांगोला, जि. सोलापूर

**आरोपी तर्फे विधीज्ञ** : ॲड. श्री. एस. एस. सरगर

**पार्ट 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०२/०३/२०२५, ०३/०३/२०२५ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०३/०३/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १५/०५/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख | १३/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | १७/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप ठेवल्याचे कलम | आरोपी निर्दोष की दोषी? | शिक्षेचा तपशील | शिक्षेत सुट. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नौशाद उर्फ नौशादमियाॅ बापुसाहेब मुलाणी | -- | -- | भा.न्या.सं. कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५)प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| १. | उल्फत नौशाद उर्फ नौशादमियाॅ मुलाणी | -- | -- | --"-- | निर्दोष | निरंक | निरंक |

## पार्ट 'क'
## अभियोग पक्षाचे साक्षादारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | बाशाजादी बापूसाहेब मुलाणी | फिर्यादी, निशाणी २३ |
| २. | बापूसाहेब दाऊन मुलाणी | निशाणी २४ |

आरोपीतर्फे पुरावा देण्यात आला नाही. न्यायालयीन साक्षीदारांकडून पुढील पुरावा नाही.

**अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव पक्ष –**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | २५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २६, २७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**क. न्यायालयातर्फे.**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | पोलिस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र.९७/२५ | एक भरीव बांबूची काठी तिची लांबी २८ इंच एका बाजुस धरणेकरीता वाकडी असलेली. |

---

## न्यायनिर्णय

( घोषीत दिनांक – १७/०३/२०२६ )

प्रस्तुतचा दावा आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहीता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) प्रमाणे चालवण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन की, फिर्यादी बाशाजादी बापुसाहेब मुलाणी हे त्यांचे पती बापुसाहेब, मुलगा जावीर सुन शाईन नातु आरमान, फारूक, फिजा असे राहणेस आहेत. तिचे पती महसुल विभागात ग्रामविकास अधिकारी म्हणुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांची मुलगी शन्नु हीस मठवस्ती पंढरपुर येथे लग्न करून दिले होते. ती मागील सोळा वर्षांपुर्वी मयत झाली होती. तीला तीन मुली अप्रीन, सुरैया तनुजा व एक मुलगा आरमान अशी चार मुले होती. ती मयत झालेनंतर त्या चारही मुलांना फिर्यादीने संभाळ केला आहे. त्यातील अप्रीन या नातीचे शिक्षण एम.एस.सी. बी.एड. पर्यंत झालेले असुन ती सध्या पुणे येथे एम.पी.एस.सी. चे क्लास शिकत खाजगी हॉस्टेलवर राहत आहे. नात सरैया हीचे लग्न झाले आहे. तनुजा ही बी.एच.एम.एस. कोर्सकरीता लातुर येथे आहे.

३. फिर्यादीचा मोठा मुलगा नौशाद बापुसाहेब मुलाणी हा शिक्षक म्हणुन नोकरी करतो. तो घराचे समोर असलेल्या फिर्यादीचे पतीचे मालकीचे घरात त्याची बायको मुलांसह राहणेस आहे. फिर्यादीची तीन एकर शेती आहे. ती शेती नौशाद हा करतो. त्यातील कोणतेही उत्पन्न तो फिर्यादीस देत नाही. उलट फिर्यादी व तिचे पती, मुलगा जावीर यांना वेळोवेळी शिवीगाळी करून दमदाटी करतो. त्याने मागील सहा महिन्यापासुन "नात अप्रीन हिस घरी येवु देवु नका तीचे वागणे बरोबर नाही. ती पुण्यात कोणासोबत प्लॉटमध्ये राहते. तीने घराण्याची इज्जत घालविली आहे. त्यामुळे माझे मुलांची लग्न होत नाही" असे म्हणुन वेळोवेळी शिवीगाळी दमदाटी केली होती. तेव्हा

गावातील पोलीस पाटील तसेच चेअरमन समाधान पवार, संजु पंडीत, शामराव गायकवाड यांनी समजावुन सांगीतले होते. तेव्हा त्रास देणार नाही असे कबुल केले होते. तरीही तो आधुन मधुन दारू पिवुन येवुन त्रास देत होता. परंतु मुलगा असलेमुळे तकार केली नाही.

४. दिनांक ०२/०३/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा चे सुमारास मुलगा नौशाद याने दारू पिवुन येवुन फिर्यादी व तिचा नवरा, सुन, मुलगा घरात असताना "तुम्ही अप्रीन हीला घरात घ्यायचे नाही, तीचे सोबत बोलायचे नाही, तीचेकडे गावातील लोक जातात हे मला माहीत झाले आहे, ती तिथे प्लॉटवर राहते व गावातील लोकांना बोलावुन घेते, त्यामुळे माझी गावात इज्जत चालली आहे, माझे मुलांची लग्न तुमचेमुळे होत नाहीत, तुम्ही अप्रीनला आसरा दिला आहे, तुम्हाला आता सोडत नाही, आज तुमचा जिव घेतो, त्याशिवाय मी शांत बसणार नाही" असे म्हणुन फिर्यादी व तिचे कुटूंबातील सर्वाना शिवीगाळी करू लागला व त्याने हातात आणलेल्या काठीने फिर्यादीचे अंगावर मारू लागला व गालात दोन तीन चापटा मारलेल्या होत्या. तेव्हा फिर्यादीचा नवरा त्याला "तु का मारतो" असे म्हणाला असता त्यांचे अंगावर धावुन जावुन काठी उगारून त्यांची गच्ची धरून मारहाण करू लागला. तेव्हा मुलगा व सुन सोडविणेकरीता आले असता त्यांनाही हाताने मारहाण करून शिवगाळी करीत होता. आरडाओडा ऐकुन गावचे पोलीस पाटील संजय पंडीत, सुनिल गायकवाड आले व त्यांनी नौशाद यास घेवुन गेले. तो पुन्हा येईल म्हणुन फिर्यादी व तिचे कुटूंबिय त्यांचे वाडयाचे दाराला कडी लावुन आत थांबलो होते.

५. दिनांक ०३/०३/२०२५ रोजी सकाळी ८:०० वा चे सुमारास वाडयाचा दरवाजा बंद असताना "ये म्हातारे दार उघड तुम्हाला आज जिवंत ठेवत नाही" असे म्हणुन दारावर दगडे मारू लागला. तेव्हा घाबरून घरात असताना दाराला जोराची धडक दिलेने दार उघडले तेव्हा नौशाद व त्याची बायको उल्फत असे दोघे घरात आले. तेव्हा नौशाद याने "तुम्हाला सांगीतलेले समजत नाही" असे म्हणुन नवरा बापुसाहेब यांचे गच्चीला धरून "तुला पैशाचा लय माज आला आहे, तुझे कीती पैसे बघतो" असे म्हणुन पेंशनचे काढलेले वरचे खिशातील ५,०००/– रूपये काढुन घेतले व सुनेने फिर्यादी व

दुसरी सुन शाईन हिस हाताने मारहाण करून "तुम्हाला लय मस्ती आली आहे, नवरा सांगतो तसे तुम्ही नाही वागलात तर तुम्हाला जिवंत ठेवत नाही" अशी धमकी देवुन निघुन गेले. जाताना वाडयाचे दरवाजाला बाहेरून कडी लावुन फिर्यादी व तिचे कुटूंबियांना घरात वाडयात कोंडुन टाकले. दारात खुर्ची टाकुन शिवीगाळी करीत "तुम्हाला कोण वाचवायला येते तेच बघतो, वाडयाला आग लावुन तुम्हाला आत जाळतो" असे म्हणुन दमदाटी करीत होता. फिर्यादी गावातील लोकांना फोन करून बोलाविले नंतर कोणीतरी दरवाजाची कडी उघडली. परंतु तो दारातच असलेमुळे आम्हाला घराचे बाहेर पडता येत नव्हते. म्हणुन अप्रीन हीला फोन केलेनंतर तीने पोलीस हेल्पलाईन ११२ वर फोन करून कळविले. सदर मारहाणीत फिर्यादीचे उजवे हाताचे तळव्याला जखम झाली असुन मुका मार लागला आहे. नात अप्रीन हीस घरी येवु द्यायचे नाही, तीचे वागणे चांगले नाही या कारणावरून मारहाण करून जखमी केलेल्या व नवरा बापुसाहेब यांचे खिशातील ५,०००/- रूपये काढुन घेवुन शिवीगाळी दमदाटी केलेल्या नौशाद बापुसाहेब मुलाणी व उल्फत नौशाद मुलाणी यांचे विरूध्द फिर्यादीने फिर्याद दाखल केली आहे.

६. फिर्यादीच्या अनुषंगाने सांगोला पोलिस स्टेशनला गु.र.नं. १८१/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास पो.हे.कॉ. व्ही. एल. बनसोडे/१२४२, सांगोला पोलिस स्टेशन यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन साक्षिदारांचे तपास टिपण नोंदवले. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपी विरुद्ध पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

७. आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहीता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) नुसार नि.क्र.१५ वर दोषारोप नोंदविले व आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखवून तसेच समजावून सांगीतला असता त्याने तो नाकबूल केला व खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपींचा भारतीय न्याय सुरक्षा संहीता ३५१ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

८. निशाणी क्र.१५ प्रमाणे खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदरील मुद्दे आणि माझे त्यावरील विष्कर्ष नमूद केलेल्या कारणांसह खालील प्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो का की, आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्देश साधण्याकरीता दि.०२/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. अगर त्या सुमारास व दि.०३/०३/२०२५ रोजी सकाळी ८.०० वा.चे सुमारास मौजे कडलास, ता. सांगोला शिवारातील फिर्यादीचे घरी काठी हे हल्याचे साधन म्हणून वापरले असता जे मृत्यू होण्याचा संभव आहे त्याच्या सहाय्याने फिर्यादी व साक्षीदारास इच्छापूर्वक दुखापत पोहोचविले ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्देश साधण्याकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापूर्वक दुखापत केली ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्दीष्ट साधणेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध केला? | **नकारार्थी** |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो का की, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्दीष्ट साधणेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा, किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश आहे, किंवा तसे होण्याचा संभव असल्याची आरोपींना जाणीव आहे? | **नकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

९. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. मुजावर व आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. एस. एस. सरगर यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक १ ते ५ बाबत –**

१०. मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असलेमुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रित विचारात घेण्यात आले. साक्षीदार क्र.१ बाशाजादी बापूसाहेब मुलाणी हे फिर्यादी असून त्यांना निशाणी २३ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीत असे सांगितले की, ते कडलास येथे तिचे पती बापूसाहेब, मुलगा जावीर, सुन शाईन, नातु आरमान, फारुक, फिजा असे राहणेस आहेत. ती आरोपींना ओळखते. दि.०२/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ती कुठे होती व काय घडले हे तिला आठवत नाही. फिर्यादीने फिर्याद व प्रथम खबर अहवालावरील तिची सही ओळखून त्यातील मजकूर तिला माहित नसल्याचे सांगितले. ती दवाखान्यात उपचाराकरीता गेली असल्याचे तिला आठवत नाही. दि.०४/०३/२०२५ रोजी पोलिस घटनास्थळी येवून घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा केला, तीने घटनास्थळ दाखवले असे काही घडले नाही. तीने गैरसमजूतीतून पोलिस स्टेशनला फिर्याद दिली.

११. साक्षीदार क्र.२ बापूसाहेब दाऊन मुलाणी (नि.२४) यांनी त्यांचे साक्षीत अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे त्यांना फितूर घोषित करण्यात आले.

१२. फिर्यादी व साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसलेने भारतीय पुरावा कायद्यानुसार सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. अभियोग पक्षास मदतपूर्ण साक्ष अभिलेखावर आणणेस अपयश आले. फिर्यादीने तिचे उलटतपासात तिच्यात व आरोपींच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे व तशी लेखी पुरसीस दाखल केली असल्याचे सांगितले.

१३. फिर्यादी व आरोपीच्यात तडजोड झाली असल्याचे निशाणी क्र.२८ कडे फिर्यादी व आरोपींनी तडजोड पुरसीस दाखल केलेली आहे. तसेच पुरावा बंद पुरसीस

दिले आहे. सदर पुरसीसचे अवलोकन केले असता सदर खटला फिर्यादी व आरोपींचे दरम्यान न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सदरकामी आरोपींच्याविरूध्द कोणताही सबळ पुरावा याकामी अभिलेखावर आलेला नाही. अशा परिस्थीतीत तडजोड झाल्याची बाब लक्षात घेता व सदर कामी आरोपींचे विरूध्द कोणताही ठोस पुरावा आला नसल्याची बाब लक्षात घेता यातील आरोपीस निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित ठरेल. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.५ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी क्र.१ नौशाद उर्फ नौशादमियॉ बापुसाहेब मुलाणी व आरोपी क्र.२ उल्फत नौशाद उर्फ नौशादमियॉ मुलाणी यांची भारतीय न्याय सुरक्षा संहीता कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहीता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३(५) अन्वयेच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचा पुर्वीचा जामीन व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपींना भारतीय न्याय सुरक्षा संहीता कलम ४८१ अन्वयेच्या पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जामिन व जातमुचलका सादर करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

४) प्रस्तुत गुन्ह्यातील मुद्देमाल पोलिस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र.९७/२५ हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.03.24 15:11:40 +0530

सांगोला
दि.१७/०३/२०२६

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 24/03/2026 |